# येशूने पौलाचे डोळे उघडले

## मिशनरी सेवाकार्याविषयीच्या पौलाच्या स्वप्नाबद्दल मुलांना शिकवा



**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, सर्व प्रकारच्या लोकांकडे सुवार्ता घेऊन जाण्याचा दृष्टांत तू पौलाला दिला. कृपा करून तसाच दृष्टांत आम्हांलाही दे. आम्हांलाही प्रत्येकाला येशूविषयी सांगायचे आहे.''*

*मुलांना शिकवण्यासाठी पुढीलपैकी कोणतीही कार्यकृती निवडा.*

**मोठया मुलाने किंवा शिक्षकाने** *शौलाची येशूशी कशी भेट झाली हा वृत्तांत प्रे.कृ.२२:१-२२ ह्या शास्त्रभागातून वाचावा किवा लक्षात ठेवून सांगावा. यावरून देवाने शौलाला येशू विषयी सांगण्यासाठी इतर देशातील लोकांकडे कसे पाठवले हे समजते.*

*वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा आणि विश्वासणारे त्याची उत्तरे देतील. तुम्हांला आवश्यकता असेल तर (प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे दिली आहेत.)*

१. *पौलाचे बोलणे ऐकून लोक एकदम शांत का झाले? (शौलाचा पालट झाल्यावर त्याचे नाव पौल झाले) (पाहा वचन २. तो त्यांच्या भाषेत बोलत होता.)*

२. *शौलाची येशूशी भेट होण्यापूर्वी तो ख्रिस्ताच्या अनुयायांशा कशी वागणूक देत असे? (पाहा वचन ५)*

३. *शौल कशामुळे आंधळा झाला? (पाहा वचन ११)*

४. *देवाने शौलाला हनन्याच्याद्वारे कोणत्या सूचना दिल्या? (पाहा वचन १५ व १६)*

५. *देवाने शौलाला कोठे पाठवले? (पाहा वचन २१)*

६. *शौलाच्या (पौलाच्या) सेवाकार्याच्या स्वप्नाविषयी यहूदी लोकांचे मत काय होते? (पाहा वचन २२)*

*वृत्तांताच्या भागांचे* **नाट्यीकरण करा.**

- *मुलांना त्यांचे छोटेसे नाटुकले सादर करता यावे यासाठी मंडळीच्या उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.*
- *मुलांकडून नाटकाची तयारी करून घेण्यासाठी वेळ दया.*
- *तुम्ही सर्व भाग उपयोगात आणलेच पाहिजेत असे नाही.*
- *मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करून घ्यावी.*
- **मोठ्या मुलांना** *किंवा प्रौढ़ांना पुढील भूमिका द्याः*

  **निवेदक,** *वृत्तांताचा सारांश सांगून मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास मदत करतो.*

  **शौल** *(नंतरचे नाव पौल)*

  **येशूची वाणी**

  **हनन्या**
- **लहान मुलांना** *पुढील भूमिका द्याः*

  **शौलाचे जोडिदार**

  **यहूदी याजक**

  *यरूशलेममधील* **यहूदी लोकांचा जमाव**

### नाटिका, शौलाचे परिवर्तन, भाग १ (प्रे.कृ.९:१-११)

**निवेदक:** *वृत्तांताचा (वचने १-११) पहिला भाग सांगून म्हणा, ''शौल काय म्हणतो ते ऐका.''*

**शौल:** *याजकांना सांगा, ''तुम्ही प्रमुख याजक आहात. दिमीस्कमधील येशूच्या शिष्यांना मला अटक करता येईल अशी पत्रे मला दया. हे असे मला देवानेच करायला सांगितले आहे!''*

**शौल व त्याचे जोडीदार:** *चालत राहा. एकाएकी अचानकपणे शौल आपले डोळे बंद करून ओरडतो आणि खाली पडतो.*

**येशूची वाणी:** *(मोठ्याने म्हणा) ''शौला! शौला! मी येशू आहे, तू माझा छळ का करीतोस?''*

**जोडीदार:** *शौलाला हाताला धरून न्या आणि म्हणा, ''प्रकाशामुळे याचे डोळे आंधळे झाले!''*

**नाटिका, भाग २ (प्रे.कृ.९:१२-२१)**

**निवेदक:** *वृत्तांताचा दुसरा भाग, वचने १२-२१, सांगून म्हणा, ''हनन्या काय म्हणतो ते ऐका.''*

**हनन्या:** *''शौला! तुझ्यासाठी प्रार्थना करावयास देवाने मला पाठवले आहे. तुला परत दृष्टी येवो! तू यहूदी नसलेल्या लोकांमध्ये जाऊन साक्ष देशील. उठ आणि बाप्तिस्मा घे.''*

**शौल:** *म्हणा, ''वा! मला आता दिसत आहे! माझे शारीरिक आणि आध्यात्मिक नेत्र आता उघडले आहे, आता मला समजले की प्रत्येकाला येशूची सुवार्ता मी जाऊन सांगावी अशी देवाची इच्छा आहे!''*

**यहूदी लोकांचा जमाव:** *(संतापाने ओरडा) ''ह्या देशद्रोह्याला हाकलून दया''*

*''हा आमचे शत्रू असणाऱ्या परराष्ट्रीय लोकांना मदत करीत आहे!''*

**निवेदक किंवा मोठा मुलगा:** *मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना, मुलांनी ह्या वृत्तांचे नाट्यीकरण प्रौढ़ांसाठी केले असेल तर त्यांना वर दिलेले प्रश्न मोठ्या माणसांना विचारायला सांगा.*

**चर्चा करा:** *पौलाला लोकांनी नाकारले तरी त्यांना येशूविषयी सांगण्याचे आपले स्वप्न त्याने कसे पूर्ण केले. मुलांना विचारा: ''आम्ही देवाचे आज्ञापालन करू नये म्हणून लोक आम्हांला कोणत्या प्रकारे अडथळे आणतात? मुलांना उदाहरणे सांगू दया.''*

**चित्र काढा** *पृथ्वीचा गोल, मुलांना ते काढायला सांगा. हे चित्र ते मोठ्या माणसांना उपासनेच्या वेळी दाखवतील आणि देव जगातील सर्व लोकांवर कशी प्रीती करतो ते यावरून समजते हे समजावून सांगतील.*

**स्पष्ट करा:** *येशू विषयी माहिती नसणाऱ्या लोकांकडे देव आम्हांला पाठवतो. त्याने शौलालाही वेगवेगळया लोकांकडे पाठवले होते.*



- *पवित्र आत्म्याने शौलाचे डोळे उघडले, त्याप्रमाणे तो इतर लोकांच्या गरजा पाहण्यासाठी आमचेही डोळे उघडेल.*
- *येशूने शौलाला दृष्टांत दिला तसा तो आम्हांलाही इतर ठिकाणी मंडळया सुरु करण्यास दृष्टांत देतो.*

**पाठ करा** *प्रे.कृ.१:८*

**स्पष्ट करा** *की प्रे.कृ.१:८ मध्ये सांगितलेली चार ठिकाणे आम्ही स्वतःला लागू करू शकतो. त्यात सांगितल्याप्रमाणे लोकांना येशू विषयी सांगण्यासाठी आम्हांला जाता येते.*

**मुलांनी** *चार ठिकाणांची उदाहरणे सांगवीत:*

१. **यरूशलेम** *हे आम्ही राहात असलेल्या समाजाचे प्रतिक आहे.*

२. **यहूदीया** *हे आमच्या आसपासच्या समाजांचे प्रतिक आहे.*

३. **शोमरोन** *हे भिन्न संस्कृतिच्या जवळच असणाऱ्या समाजांचे प्रतिक आहे.*

४. **पृथ्वीच्या शेवटापर्यंत** *म्हणजे दूरवरच्या प्रदेशांतील लोक.*

**कविता.** *तीन मुलांना नीतिसूत्रे ३:१३-१५ ह्या शास्त्रभागातून प्रत्येकी एक वचन म्हणायाला सांगा.*

**मोठ्या मुलांना** *या आठवड्याच्या विषयावर कविता, गीते किंवा नाटुकले लिहिण्यास सांगा.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net